# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.01.2026** **वारःबुधवार**

1. भविष्यवेधी प्रणालींसाठी महाराष्ट्रासोबत सहकार्याकरिता जागतिक नेत्यांना मुख्यमंत्र्यांचं आमंत्रण
2. भाजपाचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितिन नोबीन यांच्या नावाची औपचारिक घोषणा
3. राज्यातल्या 12 जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची आजअखेर मुदत आणि
4. भारत-न्यूझीलंड दरम्यान आज नागपूरमध्ये वीस षटकांचा पहिला सामना

**दावोस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक मंच शिखर परिषदेत जर्मनी, ब्राझील, फ्रान्स, बर्मुडा, गॅबॉन, यूएई आणि आफ्रिकी संघाच्या नेत्यांसोबत विविध विषयांवर महत्त्वपूर्ण संवाद साधला. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधेचं यश हे व्याप्तीवर अवलंबून होतं, तर पुढील युग हे विश्वासावर आधारित असेल, असं मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्र राज्य कृत्रिम बुद्धिमत्ता-सहाय्यित प्रशासन, भविष्यवेधी सेवा वितरण आणि नागरिक-केंद्रित उत्तरदायित्व प्रणालींचं अवलंबन करून या नव्या बदलाचं नेतृत्व करत आहे, असंही मुख्यमंत्री यावेळी बोलताना म्हणाले. या भविष्यवेधी प्रणालींसाठी महाराष्ट्र राज्यासोबत सहकार्य करण्यासाठी जागतिक नेत्यांना मुख्यमंत्र्यांनी आमंत्रित केलं.

**नितीन नबीन**

भारतीय जनता पार्टीचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांच्या नावाची औपचारिक घोषणा काल नवी दिल्लीच्या भाजपा मुख्यालयात पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉक्टर के लक्ष्मण यांनी केली. नितीन नबीन हे भाजपाचे आतापर्यन्तचे सर्वात तरुण अध्यक्ष आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नबीन यांचं अभिनंदन करत त्यांचा सत्कार केला. नबीन हे देशातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन पाहणाऱ्या पिढीतील आहेत. त्यांच्यातील तरुणाईची ऊर्जा आणि त्यांच्या संघटनात्मक कौशल्य आणि कामाच्या व्यापक अनुभवाचा पक्षाला फायदा होईल. त्यांच्यावर केवळ पक्षाचीच नाही तर, राष्ट्रीय लोकशाही आघाडीत समन्वय साधण्याची जबाबदारी आहे असं पंतप्रधान यावेळी बोलताना म्हणाले. याप्रसंगी केंद्रीय मंत्री अमित शाह, राजनाथ सिंह, नितीन गडकरी यांच्यासह अनेक मंत्री आणि भाजपा नेते उपस्थित होते.

**जि.प.निवडणूक**

राज्यातील 12 जिल्हा परिषदा आणि 125 पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपत आहे. उद्या म्हणजे 22 जानेवारीला अर्जांची छाननी होईल तर, 27 जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. 27 जानेवारीलाच अंतिम उमेदवार यादी आणि चिन्ह वाटप करण्यात येईल. 5 फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी 1 आणि पंचायत समितीसाठी एक अशी दोन मतं द्यावी लागणार आहेत.

पुणे जिल्हा परिषदेच्या 73 गटांसाठी सुमारे 940 अर्जांची विक्री झाली आहे. दौंड तालुक्यात सर्वाधिक अर्जांची विक्री झाली असून, जिल्हा परिषद गटांसाठी 130 अर्जांची विक्री झाली आहे. पुणे जिल्हा परिषदेत 'भाजप विरुद्ध दोन्ही राष्ट्रवादी' असा मुख्य सामना रंगणार असून, काँग्रेस आणि इतर छोटे पक्ष निर्णायक भूमिका बजावू शकतात.

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील 63 जिल्हा परिषद गट आणि 126 पंचायत समित्यांसाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी आतापर्यन्त 34 उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून, 1 हजार 326 अर्जांची विक्री झाली आहे. या निवडणुकीसाठी शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, वंचित बहुजन आघाडी आणि कॉंग्रेस पक्षात युतीसाठी चर्चा सुरू असल्याचं अंबादास दानवे यांनी काल सांगितलं.

**<u>रायगड-पक्षबदल</u>**

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन मतदारसंघातील म्हसळा येथील भाजप तालुका अध्यक्ष महेश पाटील यांच्यासह भाजप आणि इतर पक्षांतील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी काल शिवसेनेत प्रवेश केला. या प्रसंगी शिवसेनेचे नेते आणि मंत्री भरत गोगावले उपस्थित होते.

**<u>लाडकी बहीण-भावसार</u>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थींना 31 डिसेंबर 2025 पर्यंत e-KYC करण्याची मुदत देण्यात आली होती. मात्र काही कारणास्तव e-KYC करताना चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे योजनेच्या निकषांनुसार या लाभार्थी महिलांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

**<u>प्रजासत्ताक दिन-विशेष आमंत्रण</u>**

नवी दिल्लीत, 26 जानेवारीला होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमासाठी मुंबईतील अनुभवी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. नीता वर्टी यांना राष्ट्रपती भवनाकडून विशेष निमंत्रण मिळालं आहे. डॉ. नीता वर्टी 30 वर्षांपासून प्रसूतीशास्त्र आणि स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून कार्यरत असून, त्यांनी सैन्य दलातील रुग्ण तसंच गतीमंद मुलांसाठी उल्लेखनीय काम केलं आहे. ज्येष्ठ गायिका लता मंगेशकर यांच्यावरही त्या नियमितपणे उपचार करत असत. राष्ट्रपतींच्या निमंत्रणामुळं आपण भारावून गेल्याची भावना डॉक्टर नीता वर्टी यांनी व्यक्त केली.. त्या म्हणाल्या....

**मला आठवतं जेव्हा आम्ही मेडिकल डॉक्टर होण्याची जेव्हा आम्ही ओथ घेतो, तेव्हा खूप इनोसेंट असतो आणि त्यावेळेला आम्ही ठरवतो की सगळ्या लोकांसाठी काम करायचं, देशासाठी काम करायचं. मोठं होता होता ते थोडंसं कमी होऊ नये आणि प्रेरित प्रेरणा सतत येत राहावी. हे काम माझ्याने झालं आणि ह्याची मला माझ्या पेशंट्स कडूनच जास्त प्रेरणा मिळाली.**

**<u>प्रगती</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून प्रगती व्यासपीठामुळं यवतमाळ जिल्ह्यातल्या बेंबळा सिंचन प्रकल्पाला गती मिळाली. याविषयीचा हा वृत्तांत सादर करीत आहे माझा सहकारी योगेश रांगणेकर...

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत राबवण्यात आलेला यवतमाळ जिल्ह्यातला बेंबळा सिंचन प्रकल्प हा विदर्भातल्या कृषी क्षेत्राला मजबूत करण्याच्या उद्देशानं उभारलेला एक प्रमुख सिंचन प्रकल्प आहे. 2 एप्रिल 2007 या दिवशी 2 हजार 685 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या या प्रकल्पाला मंजुरी मिळाली. मात्र हा प्रकल्प पूर्ण होण्यात अनेक अडचणी येत राहिल्या. त्यामुळं 25 ऑक्टोबर 2023 या दिवशी पंतप्रधानांनी प्रगती व्यासपीठाच्या अंतर्गत या प्रकल्पाचा आढावा घेतला. आढाव्यानंतर त्यांनी संबंधित केंद्रीय मंत्रालयं, राज्य सरकार यांना समस्यांचं निराकरण करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगानं भूसंपादन प्रक्रिया जलद करणं, सुधारित नियोजन आणि उर्वरित कालव्याचं काम पूर्ण करण्यात आलं. अखेर गेल्या वर्षी 30 जून रोजी हा प्रकल्प कार्यान्वित झाला.**

**<u>पीएमसेतु-समारोप</u>**

पुण्यात आयोजित 'पीएम सेतू' कार्यक्रमाचा काल समारोप झाला. शाश्वत प्रगतीसाठी तसंच प्रशिक्षकांचं कौशल्य सतत अद्ययावत ठेवण्यासाठी उद्योगांनी सहकार्य करावं, असं आवाहन केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी यांनी याप्रसंगी बोलताना केलं. आयटीआय संस्थांचं आधुनिकीकरण केवळ पायाभूत सुविधांपुरतं मर्यादित न ठेवता, प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि रोजगारक्षमता वाढवण्यावर भर देणे गरजेचं आहे असं त्या म्हणाल्या. यावेळी मुखर्जी यांनी 40 हून अधिक आघाडीच्या कंपन्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला.

**<u>सांगली-मोर्चा</u>**

सांगलीतील द्राक्ष आणि बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी काल मोर्चा काढला. परदेशातून आयात होणाऱ्या बेदाण्यावर आयात शुल्क आकारावे, बेदाण्यास आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी मंडळाची निर्मिती केंद्र सरकारनं करावी, तसंच बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करावा अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

**सायकलिंग स्पर्धा**

आंतरराष्ट्रीय स्तराच्या 'पुणे ग्रँड टूर' या सायकलिंग मुख्य स्पर्धेचा पूर्वरंग असलेली प्रोलॉग स्पर्धा झाल्यानंतर काल पहिल्या टप्प्यात हिंजवडी ते आकुर्डी या मार्गावर चीनच्या 'ली निंग स्टार' संघाच्या ल्यूक मडग्वे यानं दमदार कामगिरी करत निर्विवाद वर्चस्व गाजवलं. भारतीय राष्ट्रीय संघाच्या हर्षवीर सिंग सेखॉन सर्वोत्तम भारतीय सायकलपटू ठरला. माजी लष्कर प्रमुख मनोज पांडे, पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, अभिनेते नाना पाटेकर, यांच्या हस्ते स्पर्धेचा आरंभ करण्यात आला.

मराठा हेरिटेज सर्किट नावानं शर्यतीचा दुसरा टप्पा आज पुण्याच्या कॅम्प परिसरातून सुरु होत आहे. 105 किलोमीटरच्या या मार्गात पुरंदर किल्ला, सिंहगड आणि खडकवासला धरणाचा परिसर आहे. यात 1 हजार 51 मीटरची चढण पार करताना सायकलपटूंच्या कौशल्याची कसोटी लागेल.

**सायना नेहवाल**

ऑलिंपिक पदक विजेती सायना नेहवालने बॅडमिंटनमधून निवृत्ती जाहीर केली आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे गेली दोन वर्ष सायना खेळापासून दूर होती. मात्र आता दुखणं बळावल्यामुळे आपण खेळणं थांबवत असल्याचं तिने एका पॉडकास्टच्या माध्यमातून जाहीर केलं. जागतिक क्रमवारीत अव्वलस्थान मिळवणारी ऑलिंपिक पदक जिंकणारी ती पहिली महिला भारतीय बॅडमिंटनपटू आहे. 2016 मध्ये रियो द जानिरो ऑलिंपिकच्या वेळी गुडघ्याला दुखापत झाल्यानंतरही 2017 च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिने कास्यपदक आणि 2018 च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं होतं.

**पालघर-लॉन्गमार्च**

पालघर जिल्ह्यात होणारे वाढवण बंदर आणि जिंदाल बंदर रद्द करावे, प्रलंबित वनपट्टे धारकाच्या नावावर करावेत, स्मार्ट मीटरची सक्ती रद्द करावी आणि अन्य 12 मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे काढण्यात आलेला लॉन्ग मार्च काल पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात आला. मोर्चेकऱ्यांतर्फे इथे ठिय्या आंदोलन करण्यात आलं.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड संघादरम्यानच्या वीस षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून प्रारंभ होत आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना नागपूर मधील जामठा मैदानावर खेळला जाणार आहे. या सामन्यासाठी हजारो प्रेक्षक येण्याची शक्यता लक्षात घेता, नागपूर शहर पोलिसांनी, वाहतुकीचं नियोजन केलं आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, प्रेक्षकांनी शक्यतो मेट्रोचा वापर करावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.